# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 November 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर, आयोग करणार दुबार मतदारांची पडताळणी
- महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनाअंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा
- राज्यातल्या शहरी भागांतल्या आणि प्रादेशिक योजनांमधल्या बिगर शेती वापराच्या जमिनींसाठी तुकडे बंदी कायदा रद्द
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांना १८ नोव्हेंबरपूर्वी ई-केवायसी बंधनकारक

आणि

- पैठण इथल्या संतपीठात मूलभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या खर्चास तत्वतः मंजूरी, मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

****

राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगानं काल जाहीर केला. याअंतर्गत सहा हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड होणार असल्याचं निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सांगितलं. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात कालपासून आचारसंहिता लागू झाल्याचं त्यांनी जाहिर केलं. यासंदर्भात अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी,

**''नगरपरिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास १० नोव्हेंबर पासून सुरुवात होणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर ही आहे. अर्जांची छाननी १८ नोव्हेंबरला होणार असून, २१ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेता येतील. निवडणूक चिन्हांचं वाटप २६ नोव्हेंबरला करण्यात येणार असल्याचं आयुक्तांनी सांगितलं. नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीसाठी दोन डिसेंबरला मतदान होणार असून, तीन डिसेंबरला निकाल जाहिर होईल. ही निवडणूक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र – ईव्हीएमवर घेण्यात येणार आहे.**

**राज्यातल्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाली असून, त्यानुसार मतदान होणार आहे. त्यामध्ये एकूण एक कोटी सात लाख तीन हजार ५७६ मतदार असून, यात ५३ लाख २२ हजार ८७० महिला मतदारांचा समावेश आहे. या निवडणुकांसाठी राज्यात एकूण १३ हजार कन्ट्रोल युनिट स्थापन करण्यात आले आहेत.''**

मतदार यादीत दोनदा नाव असलेल्या मतदारांना चिन्हांनी दर्शवणार असून, त्यांची पडताळणी करून फक्त एकाच ठिकाणी मतदानाची परवानगी देण्यात येणार असल्याचं आयुक्त वाघमारे यांनी सांगितलं. ते म्हणाले,

**बाईट – निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे**

****

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनांअंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल ही बैठक झाली. आता या योजनेत दोन हजार ३९९ आजारांचा समावेश करण्यात आल्याची माहिती, मुख्यमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या योजनांमध्ये आयुष्मान कार्ड निर्माण आणि वितरण करणाऱ्या आघाडीच्या फळीतल्या कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्यालाही या बैठकीत मंजुरी देण्यात आली. अधिकचा खर्च येणार्या काही विशेष आजारांमध्ये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त खर्च देण्याचा निर्णयही घेण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आरोग्य सुविधांचं विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशानं शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करणं, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या आणि १४ मार्च २०२४ रोजी दहा वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचं नियमित पदांवर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्ती करणं, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करणं, तसंच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यासही मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली.

श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम शताब्दी कार्यक्रमांसाठी ९४ कोटी ३५ लाख ६४ हजार रुपयांच्या निधीच्या तरतुदीलाही यावेळी मान्यता देण्यात आली.

**

क्रिकेट विश्वचषकावर भारताचं नाव कोरणाऱ्या भारतीय महिला संघाचं आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत अभिनंदन करण्यात आलं. या संघातल्या महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव यांचा रोख पारितोषिकानं गौरव करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

****

राज्यातल्या शहरी भागांतल्या आणि प्रादेशिक योजनांमधल्या बिगर शेती वापराच्या जमिनींसाठी तुकडे बंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. जमिनीचे तुकडे पाडण्याला प्रतिबंध करण्याचा आणि त्यांचं एकत्रीकरण करण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्याचा अध्यादेश कालपासून राज्यात लागू झाल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यामुळे आता १५ नोव्हेंबर १९६५ पासून १५ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत तुकडेबंदी कायद्याविरुद्ध झालेले जमिनींचे व्यवहार नियमित करता येतील. याचा राज्यातल्या एकोणपन्नास लाख परिवारांना लाभ होणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थ्यांनी पुढील लाभ मिळवण्यासाठी १८ नोव्हेंबरपर्यंत त्यांची ई-केवायसी पडताळणी पूर्ण करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले आहेत. या योजनेअंतर्गत ऑक्टोबर महिन्याचं मानधन कालपासून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. ही वाटचाल अशीच अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी मागील महिन्यापासून ई -केवायसी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

****

शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू, गुरु नानक देव यांची जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त नांदेडसह सर्वच गुरुद्वार्यांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना गुरू नानक यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांचे आदर्श आणि मूल्यांचा स्वीकार करून चांगला समाज निर्माण करण्यासाठी प्रेरित करणारा हा दिवस असल्याचं राष्ट्रपतीनीं म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या संतपीठात मूलभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली असल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. संतपीठाचं शैक्षणिक व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडे असून, पाच वर्षासाठी पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तसंच संतपीठात सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमासाठी अध्यापक – अध्यापकेतर कर्मचारी वेतन खर्चासाठी दरवर्षी एक कोटी देण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

****

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी काल धाराशिव तालुक्यातल्या तेर इथं पुरातत्त्व खात्याकडून सुरू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली. श्री संत गोरोबाकाका यांच्या मंदिरात सुरू असलेली विविध विकास कामं चार महिन्यात पूर्ण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तेर तीर्थक्षेत्राला अ वर्ग दर्जा देण्याच्या मागणीच्या कायदेशीर प्रक्रिया पार पाडून हा प्रस्ताव पुढे नेण्याची ग्वाहीसुद्धा शेलार यांनी दिली. ते म्हणाले,

**बाईट – सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार**

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या उद्योगांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या वापराबाबत माहिती जिल्हा प्रशासनाला सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. जिल्ह्यातल्या उद्योगांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत ते काल बोलत होते. सामाजिक उत्तरदायित्व निधीची माहिती जिल्हा प्रशासनाकडे असली की आगामी वर्षात अशा निधीतून करण्याच्या कामांचं नियोजन करता येतं, असं ते म्हणाले.

****

बीड इथं काल जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत विविध विकास कामांचा आढावा घेण्यात आला तसंच नव्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आजपासून चार दिवस मराठवाडा दौऱ्यावर येत आहेत. "दगाबाज रे" संवाद दौऱ्याच्या माध्यमातून ते शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून त्यांच्या दौऱ्याची सुरुवात होईल.

****

बीड ते नाळवंडी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला वारंवार निवेदनं देऊनही काही कारवाई न झाल्यानं नाळवंडीच्या ग्रामस्थांनी काल अर्धनग्न बैलगाडी मोर्चा काढला. बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****